# २४९८

अमर अजर बाल श्रीपाद अज
व्रतबंधानंतर बनती द्विज
कौतुके धरती मानवी आकार
जरी साक्षात ॐकार निराकार

भिक्षेस जेव्हा जाती घराघरात
ॐ भवति भिक्षां देहि च्या बदल्यात
दो चौपाती देव लक्ष्मी या शब्दांत
गढती गुणसंख्याबोध संकेत

वाच्यार्थ तर सर्वांसी ज्ञात
विविध भाषांची सरमिसळ
शिकवीती नको भाषी भेद
भाषा नच महत्त्वाचा भाव

वरवर वाटे दो आणि दोन
चपाती चौपाती शब्दपर्याय
दे देओ वा देव एकच अर्थ
लक्ष्मी गृहलक्ष्मीला संबोधन

लक्ष्यार्थ परी असे गूढ
दो हे जीव शिव द्वैत
चौपाती हे चार वेदांग
लक्ष्मी माया देव ब्रह्म

चार शब्दांच्या चार संख्या
संकेती मग त्या गुंफील्या
दोन चार नऊ आठ अशा
श्रीपादांची गूढ किमया

दोन चार सोपे समजण्या
आठ नऊ कठीण कळण्या
उभयांतील आधीच्या संख्या
दाखविती गुण अधिक वजा

नऊ एकांकांतील सर्वोच्च
जसा परमात्मा परब्रह्म
आठ खाली मायेचे स्थान
इतर अंक शून्यातील विश्व

- नारायण
०७/२७/१८
(गुरुपौर्णिमा, शके १९४०)